**E-Filing**

MHAU120009172025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–२९५/२०२५**
**पंडित राऊत वि. कोणीही नाही**

**निशाणी क्र. १ खालील आदेश**

**०१.** अर्जदार क्र.१ ते ७ यांनी सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांच्या अर्जात असे आले आहे की, मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचा मृत्यु दिनांक **१२.१०.२०१८** रोजी मौजे सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत गुंताबाई यांचे मुले, क्र.५ ही मुलगी, क्र.६ ही सुन व क्र.७ हा नातु आहे. तसेच मयत गुंताबाई यांचा एक मुलगा एकनाथ महादु राऊत हा दि.१८.०९.२०२४ रोजी झालेला आहे. तसेच मयत गुंताबाई यांचे पती महादु जगलू राऊत हे यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, ते मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचे वारस आहेत. सबब, अर्जदारांनी सदरचे प्रकरण हे मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

**०३.** अर्जदार क्र.३ **पुंडलिक माधवराव राऊत** यांनी त्यांच्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.८** वर दाखल केला. तसेच अर्जदारांनी मयताचे मृत्युप्रमाणपत्र **नि.क्र.९ व १०** वर दाखल केले. त्यानंतर अर्जदार क्र.१ यांनी **नि.क्र.१२** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०४.** अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. वाय. आर. जावळे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हे मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचे वारस आहे, तसेच अर्जदारांना शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०५.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन **औरंगाबाद** आवृत्तीच्या दिनांक ०८.११.२०२५ रोजीच्या **"आनंद नगरी"**

आवृत्तीच्या पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली, ती **नि.क्र.११** नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा नगरपंचायत कार्यालय सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल **नि.क्र.५** नुसार अभिलेखात दाखल आहे.

**०६.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. अर्जदारांनी दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **गुंताबाई महादु राऊत** हया **दि.१२.१०.२०१८** रोजी मयत झाल्या. तसेच अर्जदार क्र.१ ते ७ हे मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदार क्र.१ ते ७ यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार क्र.१ पंडित महादु राऊत, क्र.२ केशव माधव (महादु) राऊत, क्र.३ पुंडलिक माधवराव राऊत, क्र.४ ज्ञानेश्वर माधव राऊत, क्र.५ कलाबाई दशरथ सपकाळ, क्र.६ तापाबाई एकनाथ राऊत व क्र.७ आनंदा एकनाथ राऊत हे मयत **गुंताबाई महादु राऊत** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारांचा कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

४. अर्जदारांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.04.23 13:58:50 +0530

**दिनांक** – २३.०४.२०२६

[एम. बी. पाटील]

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

सोयगांव